**CNR : MHST05000314 – 2019**

**<u>नि. दि. मु. क्र. २१९/२०१९</u>**

अरूण बळवंत मोहिते वगैरे ..... **वादी**

**वि.**

जिल्हाधिकारी सातारा वगैरे .... **प्रतिवादी**

**<u>नि. ५ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी यांनी वादींच्या जमिनीतील संपादित केलेल्या क्षेत्राशिवाय शिल्लक क्षेत्रामध्ये रस्ता करु नये व ति-हाईत इसमांचा हितसंबंध निर्माण करु नये असा तुर्तातूर्त मनाईचा आदेश मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. या अर्जास प्रतिवादी क्र.२ ने नि.२८ वर म्हणणे दिले आहे व अर्जास तिव्र विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केलेली आहे.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व युक्तिवाद यावरुन वादीचे असे म्हणणे आहे की, मौजे उमरकांचन, ता.पाटण येथील वादीच्या जमिनींमधील काही क्षेत्र वांग प्रकल्पासाठी ढेबेवाडी उमरकांचन, जिंती या वळण रस्त्यासाठी संपादन केलेले आहे. त्या संपादित जमिनीमध्ये प्रतिवादी रस्ता न करता भूखंड तयार करत आहे व शिल्लक राहीलेल्या जमिनीमधून रस्ता तयार करण्याच्या प्रयत्नात आहे. संपादित जमिनीमधून रस्ता करण्यास वादींची कसलीही हरकत नाही. परंतु शिल्लक क्षेत्रातून रस्ता केल्यास वादींच्या क्षेत्राचे नुकसान होणार आहे व त्यांना जमिनीच्या वापरापासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे त्यांचे पैशात न भरुन येणार अपरिमीत नुकसान होणार आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे आहे की, वादींच्या शेतजमिनीतील संपादित क्षेत्राची भरपाई पुर्वीच वादींना देऊ केली आहे. त्यामुळे वादींना हा दावा करण्याचा अधिकार नाही. जास्त भरपाई मिळावी म्हणून हा खोटा दावा केला आहे. संपादन केलेल्या जमिनीतूनच रस्ता करणार आहेत,त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादीची कथने व युक्तिवादातील निवेदन विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे त्याच्या निष्कर्षासह खालील प्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी यांच्या बाजूने दाव्यामध्ये प्रथमदर्शनी परिस्थिती असल्याचे वादी यांनी शाबीत केले आहे का ? | **होय.** |
| २ | न्यायाचे समतुलत्व वादीच्या बाजुने आहे का? | **होय.** |
| ३ | तुर्तातुर्त मनाई आदेश न केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे का? | **होय.** |
| ४ | अंतिम आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज मंजूर केला आहे.** |

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत -**

५. सदरचे मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्यावर एकत्रितरित्या चर्चा करुन निष्कर्ष देत आहे.

६. मौजे उमरकांचन, ता. पाटण येथील गट नं.८३३ एकूण क्षेत्र १ हे. १ आर पैकी १८ आर संपादन, गट नं.८३४ एकूण क्षेत्र १ हे. ८ आर पैकी २५ आर संपादन , गट नं.८४३ एकूण क्षेत्र ० हे. ६३.७ आर पैकी १ आर संपादन, गट नं.८७३ एकूण क्षेत्र ० हे. २५ आर पैकी ६ आर संपादन, गट नं.८७६ एकूण क्षेत्र ० हे. ३ आर पैकी ३ आर संपादन , गट नं.८७७ एकूण क्षेत्र ० हे. ३ आर पैकी १ आर संपादन व गट नं.८८० एकूण क्षेत्र ० हे. ८ आर पैकी १ आर संपादन झालेले क्षेत्र व उर्वरीत क्षेत्र वाद जमिनी आहेत.

७. सदरच्या जमिनी वादी व इतर लोकांच्या मालकी हक्काच्या आहेत. वादींच्या जमिनीतील काही क्षेत्र भू संपादन निवाडा क्र.४/एसआर/७३८/२००० प्रमाणे दि.३०/०३/२००५ रोजी होऊन

त्याप्रमाणे वर नमूद क्षेत्राचे संपादन ढेबेवाडी उमरकांचन जिंती वळण रस्त्यासाठी झालेले आहे. संपादित क्षेत्रामध्ये गेल्या १६ वर्षामध्ये रस्ता तयार केलेला नाही. जमीनीचे ७/१२ उतारे व भू संपादन निवाडा वादींनी नि.३ यादीसोबत दाखल केलेला आहे.

८. दि.१३/०१/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.२ हे गट नं.८३३ मध्ये रस्त्याची फेरआखणी करण्यासाठी आले व त्यांनी रस्त्यासाठी संपादन केलेले क्षेत्र सोडून उर्वरीत क्षेत्रात नियोजित रस्ता करण्यास सुरुवात केली व त्यामुळे वादींनी हरकत घेतली असे वादींचे कथन आहे.

९. वादींचा दावा वाचला असता त्यांच्या जमिनीतून संपादन झालेल्या जमिनींचा मोबदला वादींनी स्वीकारला आहे व संपादित जागेचा कब्जा प्रतिवादींना दिलेला आहे असे वादींनी कथन केले आहे व त्याबाबत कसलाही वाद नाही. वादींचे म्हणणे एवढेच आहे की, निवाडयाप्रमाणे संपादित झालेल्या जमिनीमधून प्रतिवादींनी रस्ता करावा. झालेल्या भू संपादन प्रक्रीयेस वादींनी आव्हान दिलेले नाही.

१०. प्रतिवादी क्र.१ विरुध्द वादींनी कसलीही दाद मागितलेली नाही. परंतु प्रतिवादी क्र.१ च्या वकीलांनी निवेदन केले की, भू संपादन प्रक्रियेला आव्हान दिलेला अथवा त्या प्रकियेसंदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित केलेला दावा चालविण्याचा अधिकार दिवाणी कोर्टास नाही. त्यांनी **State of Bihar Vs. Dhirendrakumar and others reported in AIR 1995 Supreme Court, 1955, (2)Laxmi Chand & ors. Vs. Grampanchayat, Karariya & ors. Reported in AIR. 1996 Supreme Court 523, (3) S.P.Subramanya Swami & ors. Vs. Karnataka State Road Transport Corporation & ors. Reported in AIR 1997 Supreme Court, 2076** या न्यायनिर्णयांचे दाखले दिले. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादींनी भू संपादन प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नाही व त्यास आव्हानही दिले नाही. त्यामुळे सदरचे न्यायनिर्णय या कामी लागू होणार नाहीत.

११. वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे व कागदपत्रे विचारात घेता प्रतिवादींतर्फे संपादन झालेल्या जमिनीमधून रस्ता करण्यास वादींची कसलीही हरकत नाही असे स्पष्ट दिसते. उर्वरीत जमिनीमधून रस्ता करू नये असे वादींचे म्हणणे आहे. त्यामुळे वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी बाब

असल्याचे दिसून येते. न्यायाचे समतुलत्व वादीच्या बाजूने आहे. प्रतिवादींनी संपादित क्षेत्र सोडून उर्वरीत क्षेत्रात रस्ता केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. म्हणून या मुद्दयांचे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** -

१२. वरील चर्चेवरुन असे दिसते की, वादीने त्याची कथने सिध्द केलेली आहेत व त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे कोणीही व्यक्ती यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपर्यंत दावा मिळकतीतील संपादित क्षेत्र सोडून इतर क्षेत्रामध्ये रस्ता करु नये व ति-हाईत इसमांचा हितसंबंध निर्माण करु नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश दिलेला आहे.

२. या अर्जाचा खर्च हा दाव्याच्या मूळ खर्चात समाविष्ट राहील.

(न्यायासनावर निवेदीत व अधिघोषीत केले)

Prasad Anant Savadikar

Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2019.08.14 11:49:44 +0530

कराड. **(प्र. अ. सवदीकर)**

दि. १३/०८/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड